RNI No. MAHBIL /2009/31733
Reg. No. MH/MR/South-322/2013-15

सत्यमेव जयते

# महाराष्ट्र शासन राजपत्र

## असाधारण भाग चार–अ

वर्ष ४, अंक ८९] गुरुवार, फेब्रुवारी १४, २०१३/माघ २५, शके १९३४ [पृष्ठे ८, किंमत : रुपये २५.००

**असाधारण क्रमांक २१**

**प्राधिकृत प्रकाशन**

**महाराष्ट्र शासनाने केंद्रीय अधिनियमांन्वये तयार केलेले (भाग एक, एक-अ आणि एक-ल यांमध्ये प्रसिद्ध केलेले नियम व आदेश यांव्यतिरिक्त) नियम व आदेश**

**उद्योग, ऊर्जा व कामगार विभाग**

मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरू चौक, मंत्रालय, मुंबई ४०० ०३२, दिनांक १२ फेब्रुवारी २०१३

**अधिसूचना**

**ऊर्जा संवर्धन अधिनियम, २००१.**

क्रमांक अपाऊ-२०११/प्र.क्र. १८७/ऊर्जा-७.—ऊर्जा संवर्धन अधिनियम, २००१ (२००१ चा ५२) याचे कलम ५७, पोट-कलम (२), खंड (ग) तसेच कलम १६ ची पोट-कलमे (१) व (४) आणि कलम ५९ चे पोट-कलम (२) यांद्वारे, प्रदान करण्यात आलेल्या अधिकारांचा वापर करून, महाराष्ट्र शासन, याद्वारे, पुढील नियम करीत आहे :—

१. **संक्षिप्त नाव व प्रारंभ.—**

(१) या नियमांना, महाराष्ट्र राज्य ऊर्जा संवर्धन निधी नियम, २०१३ असे म्हणावे.

(२) ते, तात्काळ अंमलात येतील.

२. **व्याख्या.**—या नियमांमध्ये, संदर्भानुसार दुसरा अर्थ अपेक्षित नसेल तर,—

(क) “ अधिनियम ” याचा अर्थ, ऊर्जा संवर्धन अधिनियम, २००१ (२००१ चा ५२) असा आहे ;

(ख) “ लाभार्थी ” याचा अर्थ, निधीचा लाभार्थी, असा आहे ;

(ग) “ ग्राहक ” याचा अर्थ, ऊर्जा संवर्धन अधिनियम, २००१ अन्वये संबोधला जाणारा ग्राहक असा आहे आणि यामध्ये, वीज अधिनियम, २००३ (२००३ चा ३६) मध्ये व्याख्या केल्याप्रमाणे कोणत्याही ग्राहकांचा समावेश होतो ;

(घ) “ निधी ” याचा अर्थ, अधिनियमाच्या कलम १६ अन्वये गठीत केलेला महाराष्ट्र राज्य ऊर्जा संवर्धन निधी, असा आहे ;

(ड़) “ शासन ” याचा अर्थ, महाराष्ट्र शासन, असा आहे ;

(च) “ प्राधिकरण ” याचा अर्थ, संस्था नोंदणी अधिनियम, १८६० अन्वये नोंदणी केलेले महाराष्ट्र ऊर्जा विकास अभिकरण, असा आहे ;

(छ) “ राज्य ” याचा अर्थ, महाराष्ट्र राज्य, असा आहे ;

(ज) या नियमांमध्ये वापरलेले व व्याख्या न केलेले परंतु अधिनियमामध्ये व्याख्या केलेले शब्द व शब्दप्रयोग यांना, त्या अधिनियमामध्ये अनुक्रमे जे अर्थ नेमून दिलेले असतील तेच अर्थ असतील.

३. **निधीची स्थापना.—** महाराष्ट्र राज्य ऊर्जा संवर्धन निधी या नावाने ओळखला जाणारा एक निधी स्थापन करण्यात येईल.

४. **निधी प्रबंध करणारे प्राधिकरण.---**

राज्यामध्ये ऊर्जेचा प्रभावीपणे वापर करण्यास आणि तिचा उपयोग करण्यास चालना देण्यासाठी महाराष्ट्र ऊर्जा विकास अभिकरणाकडून निधी प्रबंध करण्यात येईल.

५. **निधी प्रबंध प्राधिकरणाचे अधिकार व कार्ये.—**

(१) प्राधिकरण, निधी प्रबंध करताना, पुढील अधिकारांचा वापर करील :—

(एक) निधीच्या संबंधातील बाबी निर्धारित करणे व त्यांचे विनियमन करणे ;

(दोन) निधीचे प्रबंध व व्यवस्थापन यांच्या संबंधातील कोणतेही उपविधी, प्रक्रिया, कार्यपद्धती तयार करणे, त्यात सुधारणा करणे किंवा त्यांचे निरसन करणे ;

(तीन) प्रत्येक वर्षासाठी निधीचे अर्थसंकल्पीय अंदाज तयार करणे व खर्चास मंजुरी देणे ;

(चार) या नियमामध्ये नमूद केल्याप्रमाणे निधीच्या स्त्रोतांद्वारे निधीच्या प्रयोजनासंबंधातील अर्थपुरवठ्यात वाढ करणे ;

(पाच) निधी प्रबंधाच्या अनुरोधाने वेळोवेळी निर्धारित करण्यात येईल अशा रितीने निधीची सर्व प्रकारे वित्तीय व्यवस्था करणे व निधीत गुंतवणूक करणे आणि निधीतील पैशांची देवघेव करणे ;

(सहा) निधी प्रबंध व व्यवस्थापन यांच्या कामकाजाबाबतीत सुयोग्य अशी प्रशासकीय व तांत्रिक संरचना निर्माण करणे व ती हाताळणे.

(२) प्राधिकरण, निधी प्रबंध करताना पुढील कार्ये पार पाडील.—

(एक) ऊर्जा संवर्धन, ऊर्जेचा कार्यक्षम वापर, ऊर्जा व्यवस्थापन व पर्यावरण यांच्या संबंधात विविध प्रकल्प, योजना किंवा कार्यक्रम तयार करणे व त्याची मांडणी करणे ;

(दोन) प्रकल्प, योजना किंवा कार्यक्रम यांच्यासाठी निधी मंजूर करणे व त्याचे संनियंत्रण करणे आणि असे प्रकल्प, योजना किंवा कार्यक्रम यांसाठी वित्तीय सहाय्य पुरविणे ;

(तीन) ऊर्जा संवर्धन, ऊर्जेचा कार्यक्षम वापर, ऊर्जा व्यवस्थापन व पर्यावरण यांच्या संबंधात जनजागृती निर्माण करणारे कार्यक्रम, चर्चासत्रे, कार्यशाळा, प्रदर्शने, मोहिमा यांचे आयोजन करणे ;

(चार) निधीसंबंधातील वार्षिक लेखे व वार्षिक अहवाल यांवर विचार विनिमय करणे व त्यांना मान्यता देणे ;

(पाच) राज्य शासनाकडून प्राधिकरणाला वेळोवेळी नेमून देण्यात येतील अशी इतर कार्ये पार पाडणे आणि अशा इतर कर्तव्यांचे पालन करणे ;

(सहा) योग्य प्रकारे निधी प्रबंध करण्यासाठी आवश्यकता वाटेल किंवा अनुषंगिक असेल अशा इतर अधिकारांचा वापर करणे किंवा अशा इतर कर्तव्यांचे पालन करणे.

६. **निधीचे स्त्रोत.—निधीच्या स्त्रोतांमध्ये पुढील बाबींचा अंतर्भाव असेल :—**

(क) अधिनियमांतर्गत स्थापन झालेल्या ब्युरो ऑफ एनर्जी एफिशियन्सी (ऊर्जा कार्यक्षमता विभाग) यांच्याकडून प्राप्त झालेल्या सर्व रकमा ;

(ख) महाराष्ट्र शासन, भारत सरकार, प्राधिकरण किंवा त्यासारख्या इतर संघटना यांच्याकडून प्राप्त झालेले अनुदान, अर्थ सहाय्य, वित्तीय सहाय्य, कर्जे किंवा ठेवी, खाजगी किंवा स्थानिक क्षेत्र, स्थानिक व विदेशी अशासकीय संघटना, प्रतिष्ठान, देणगी देणारी अभिकरणे यांच्याकडून प्राप्त झालेला पैसा आणि विदेशी सरकार किंवा आंतरराष्ट्रीय संघटना व व्यक्ति यांच्याकडील सहाय्य किंवा अनुदाने ;

(ग) निधीतून मिळालेले व्याज व इतर लाभ ;

(घ) ऊर्जा संवर्धन व त्यासंबंधातील कार्ये यांच्या प्रयोजनासाठी राष्ट्रीय किंवा आंतरराष्ट्रीय वाणिज्यिक व वित्तीय संस्था यांच्याकडून प्राप्त झालेल्या कर्जाची कोणतीही रक्कम ;

(ङ) निधीत वाढ करण्यासाठी, शासनाने लादलेला आणि निधीत जमा केलेला अधिभार किंवा शास्ती, कोणतीही असल्यास ;

(च) व्यक्ती किंवा संस्था यांच्याकडून प्राप्त झालेली देणगी, वर्गणी, अंशदान, उपहार, सहाय्य व कर्जे ;

(छ) अधिनियमाच्या किंवा त्याखाली केलेल्या नियमांच्या तरतूदींअन्वये निधीत जमा करण्याची परवानगी असलेली इतर कोणतीही रक्कम ;

(ज) निधी प्रबंध करण्याच्या अनुरोधाने प्राप्त होणारे व मिळणारे सेवा आकार, परिरक्षण आकार, संमंत्रणा शुल्क, इतर कोणतेही शुल्क आणि इतर कोणतेही उत्पन्न ;

(झ) ऊर्जा संवर्धनाच्या प्रयोजनासाठी वीज विक्री किंवा वीज निर्मिती यांवर लावलेला आणि शासनाने निधीत वळता केलेला कोणताही कर किंवा उपकर ;

(ञ) ऊर्जा संवर्धनाच्या किंवा ऊर्जेचा कार्यक्षम वापर करण्याच्या प्रयोजनासाठी कोणतेही स्थानिक शासन, सार्वजनिक उपक्रम, वितरण अनुज्ञप्तीधारक यांच्याकडून प्राप्त झालेल्या ठेवी.

**७. ज्या प्रयोजनांसाठी निधी उपयोगात आणला जाईल ती प्रयोजने.—**

(१) निधी पुढील बाबींकरिता उपयोगात आणण्यात येईल :—

(क) ऊर्जेचा कार्यक्षम वापर आणि तिचे संवर्धन यांच्या प्रयोजनार्थ, शासकीय विभाग, राज्य उपक्रम, सार्वजनिक मर्यादित कंपन्या, ग्राहक संघटना, खाजगी संघटना, शिक्षण संस्था अथवा वीज वितरण कंपनीचा कोणताही ग्राहक यांच्या प्रकल्पांमध्ये गुंतवणूक करण्यासाठी म्हणून अनुदान, सामान्य व अल्पव्याजी कर्जे, गुंतवणूक, अर्थसहाय्य, पत हमी किंवा जोखीम हमी यांच्या स्वरूपात वित्तीय सहाय्याची तरतूद करणे ;

(ख) ऊर्जा संवर्धन, ऊर्जा कार्यक्षमता, ऊर्जा व्यवस्थापन आणि पर्यावरण यांच्याशी संबंधित प्रकल्प, योजना, कार्यक्रम यांकरिता आणि त्यावरील खर्च भागविण्यासाठी वित्तीय सहाय्याची तरतूद करणे ;

(ग) विशेषकरून ग्राहक, औद्योगिक व वाणिज्यिक क्षेत्रे, शाळेतील मुले, शेतकरी आणि जनता यांच्याकरिता ऊर्जेचा कार्यक्रम वापर व तिचे संवर्धन करण्याबाबत जनजागृती निर्माण करण्यासाठी तसेच माहिती प्रसारित करण्यासाठी उपाययोजना करण्यावर केलेला खर्च भागविणे ;

(घ) ऊर्जेचा कार्यक्षम वापर व तिचे संवर्धन यांबाबत कर्मचारीवर्ग व विशेषज्ञ यांना देण्यात येणाऱ्या प्रशिक्षणावरील खर्च भागविणे ;

(ड़) ऊर्जा कार्यक्षम प्रक्रिया, स्वरूप, सामग्री, साधने व पद्धती यांच्या वापरास चालना देणे ;

(च) ऊर्जा संवर्धन आणि ऊर्जा कार्यक्षमता यांवरील तसेच सामग्री, उपकरणे व प्रक्रिया पद्धती यांची ऊर्जा कार्यक्षमता यावरील प्रयोगनिर्देशक प्रकल्प व पथदर्शी प्रकल्प यांच्याकरिता वित्तीय सहाय्याची तरतूद करणे ;

(छ) ऊर्जेच्या वापराबाबतची माहिती संकलन, विश्लेषण व सर्वेक्षण, ऊर्जा विकास, प्रचालन व संवर्धन यांवरील संशोधन प्रकल्पांचा अभ्यास करणे किंवा ते पार पाडणे ;

(ज) ऊर्जा संवर्धन क्षेत्रात संशोधन व विकास यांस उत्तेजन देण्यावरील खर्च भागविणे ;

(झ) सामग्री व उपकरणे यांची चाचणी व प्रमाणन करण्याबाबतची कार्यपद्धती विकासित करमे, त्यांच्या ऊर्जा वापराबाबतचे प्रमाणन किंवा पडताळणी करण्यासाठीची चाचणी सुविधा निर्माण करणे, यांवरील खर्च भागविणे ;

(ञ) ऊर्जेचा कार्यक्षम वापर आणि तिचे संवर्धन यांस चालना देण्याबाबतच्या पथदर्शी प्रकल्पांच्या व प्रयोगनिर्देशक प्रकल्पांच्या अंमलबजावणीची आखणी करण्यावर आणि ती सुलभ करण्यावर झालेला खर्च भागविणे आणि ऊर्जा कार्यक्षमता विभागाने (ब्युरो ऑफ एनर्जी इफिशियन्सी) विभागाने हाती घेतलेल्या अशा प्रकल्पांसाठी अनरूप अनुदानाची तरतूद करणे ;

(ट) केंद्र पुरस्कृत योजनांसाठी तसेच राज्यामध्ये राबविण्यात येणाऱ्या ऊर्जा कार्यक्षमता विभागाच्या (ब्युरो ऑफ एनर्जी इफिशियन्सी) योजनांसाठी अनुरूप अनुदान भागविणे ;

(ठ) ऊर्जेचा कार्यक्षम वापर आणि तिचे संवर्धन यांच्याशी संबंधित असलेला व प्राधिकरणाने अथवा शासनाने मान्यता दिलेला कोणताही प्रकल्प, योजना किंवा कार्यक्रम यावरील खर्च भागविणे ;

(ड) ऊर्जा कार्यक्षमता, ऊर्जा संवर्धन किंवा मागणीनुरुप व्यवस्थापन यांबाबत नवकल्पक प्रकल्पांवरील खर्च भागविणे ;

(ढ) निधी प्रबंधाशी संबंधित प्राधिकरणाच्या ऊर्जा संवर्धन कक्षाचे संघटन व व्यवस्थापन यांच्या संबंधातील खर्च भागविणे ;

(२) नियम ६ मध्ये विनिर्दिष्ट केल्याप्रमाणे निधीकरिता आणि निधीमार्फत प्राप्त झालेला सर्व पैसा, राष्ट्रीयीकृत बँकांमध्ये चालू अथवा बचत खात्यांमध्ये किंवा मुदत ठेवींमध्ये ठेवण्यात येईल. प्राधिकरण ठरवील अशा रीतीने उक्त खाती चालविण्यात येतील.

**८. निधीचे प्रवर्तन.—**

महासंचालक, निधिच्या मंजूर अंदाजपत्रकानुसार सर्व खर्चास मान्यता देतील.

**९. निधीतून सहाय्य देण्याबाबतची प्राधिकरणाची मानके, मार्गदर्शक तत्वे व कार्यपद्धती.—**

प्राधिकरण, निधीतून सहाय्य देण्यासाठी यथोचित मानके, मार्गदर्शक तत्वे व कार्यपद्धती तयार करील. निधीतून सहाय्य देण्याकरिता निधी-पात्रता मानके, प्रस्ताव तयार करणे, योजना व कार्यक्रम विषयक मार्गदर्शक तत्वे, मूल्यमापनविषयक मार्गदर्शक तत्वे वेळोवेळी तयार करण्यात येईल.

**१०. लेखे व लेखा परीक्षा.—**

(क) प्राधिकरण, निधीची लेखापुस्तके ठेवील आणि मुंबई सार्वजनिक विश्वस्त व्यवस्था अधिनियम, १९५० (१९५० चा मुंबई २९) याच्या कलम ३२ च्या पोट-कलम (२) च्या ततरतूदींशी अनुरूप असेल अशा, प्राधिकरण मान्यता देईल त्या नमुन्यात व त्या रितीने वार्षिक लेखा विवरणपत्र व ताळेबंद तयार करील. प्राधिकरण आपले उत्पन्न व खर्चाचे विवरण पत्र दर तीन महिन्यांनी राज्य शासनाला सादर करील ;

(ख) प्राधिकरण नियुक्त करील अशा सनदी लेखापालांकडून निधीच्या लेख्यांची लेखापरीक्षा करण्यात येईल. महालेखापाल, महाराष्ट्र राज्य, यास, स्वविवेकानुसार, कोणत्याही वेळी, निधीच्या लेख्यांची लेखापरीक्षा करता येईल. महालेखापालाने कोणताही लेखा परीक्षा अहवाल तयार केला असल्यास, तो राज्य शासनास सादर करण्यात येईल ;

(ग) अशा प्रकारे नियुक्त केलेल्या सनदी लेखापालाने प्रमाणित केलेले निधीचे लेखे, त्यांवरील लेखा परीक्षा अहवालासह, राज्य शासन, ऊर्जा कार्यक्षमता विभाग (बीइइ) आणि राज्य ऊर्जा संवर्धन समिती, यांना दरवर्षी सादर करण्यात येतील.

**११. वार्षिक अहवाल.—**

प्राधिकरण, प्रत्येक वित्तीय वर्षी, मागील वित्तीय वर्षात निधीतून हाती घेण्यात आलेल्या कामांचा खरा व संपूर्ण हिशेब देणारा वार्षिक अहवाल तयार करील, आणि अशा अहवालाची एक प्रत शासनाला सादर करील.

**१२. निधी बंद करणे.—**

(क) जोपर्यंत अधिनियमाच्या संबंधित तरतूदी अंमलात असतील तोपर्यंत निधी प्रवर्ती राहिल ;

(ख) निधी आणखी प्रवर्ती ठेवण्याची गरज असणार नाही अशा परिस्थितीत निधी बंद करण्याच्या वेळी, निधीतील खर्च न केलेल्या सर्व शिल्लक रकमा शासनाला परत करण्यात येतील.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

**अजोय मेहता,**
शासनाचे प्रधान सचिव.

c/155
५

## INDUSTRIES ENERGY AND LABOUR DEPARTMENT

Madam Cama Road, Hutatma Rajgur Chowk, Mantralaya,
Mumbai 400 032, dated the 12th February 2013

*NOTIFICATION*

ENERGY CONSERVATION ACT, 2001.

No. Apau. 2011/C.R. 187/Energy-7.—In exercise of the powers conferred by clause (*c*) of sub-section (2) of section 57 read with sub-sections (*1*) and (*4*) of section 16 and sub-section (2) of Section 59 of the Energy Conservation Act, 2001 (52 of 2001), the Government of Maharashtra hereby makes the following rules, namely :—

1. *Short title and Commencement.*—(1) These Rules may be called the Maharashtra State Energy Conservation Fund Rules, 2013.

(2) They shall come into force at once.

2. *Definitions.*—In these Rules, unless the context otherwise requires,—

(*a*) " Act " means the Energy Conservation Act, 2001 (52 of 2001) ;

(*b*) " Beneficiary " means beneficiary of the Fund ;

(*c*) " Consumer " means designated consumer under the Energy Conservation Act, 2001 and includes any consumers as defined in the Electricity Act, 2003 (36 of 2003) ;

(*d*) " Fund " means the Maharashtra State Energy Conservation Fund, constituted under section 16 the Act ;

(*e*) " Government " means the Government of Maharashtra ;

(*f*) " Authority " means the Maharashtra Energy Development Agency (MEDA), registered under the Societies Registration Act, 1860 ;

(*g*) " State " mean the State of Maharashtra ;

(*h*) Words and expressions used herein and not defined in these rules but defined in the Act, shall have the same meanings, as assigned to them respectively, in that Act.

3. *Establishment of the Fund.*—There shall be established a Fund to be called by the name the Maharashtra State Energy Conservation Fund.

4. *Authority to administer the Fund.*—For the purposes of promotion of efficient use of energy and its consumption within the State, the Fund shall be administered by the Maharashtra Energy Development Agency.

5. *Powers and functions of the Authority administering the Fund.*—

(*1*) The Authority, while administering the Fund shall exercise the following powers, namely :—

(*i*) to detemine and regulate matters concerning the Fund ;

(*ii*) to make, amend or repeal any bye-laws, procedure, methodology relating to the administration and management of the affairs of the Fund ;

(*iii*) to frame the budget estimates of the Fund for each year and sanction the expenditure ;

(*iv*) to raise finance in regard to the purpose of the Fund through sources of the Fund as mentioned in these Rules ;

(*v*) to make all financial arrangements and to invest and deal with the moneys of the fund, in such manner as may, from time to time, be determined in pursuance of the administration of the Fund ;

(*vi*) to create and handle suitable administrative and technical structures for the administration and management of the affairs of the Fund ;

(2) The Authority while administrering the Fund, perform the following functions :—

(*i*) to frame and formulate various projects, schemes or programmes relating to energy conservation, energy efficiency, energy management and environment ;

(*ii*) to sanction and monitor funds for the projects, schemes or programmes and to provide financial assistance for such projects, schemes or programmes ;

(*iii*) to organise awareness programmes, seminars, workshops, exhibitions, campaigns relating to energy conservation, energy efficiency, energy management and environment ;

(*iv*) to consider and approve the annual accounts and the annual reports of the Fund ;

(*v*) to perform such other functions and carry out such other duties as may, from time to time, be assigned to the Authority by the State Government ;

(*vi*) to exercise generally such other powers and perform such other duties as may be necessary or incidental to the proper administration of the Fund ;

6. *Sources of the Fund.*—The sources of the Fund shall consist of the following :—

(*a*) all sums of money received from the Bureau of Energy Efficiency Established under the Act ;

(*b*) Grants, subsides, Financial assistance, loans or deposits received from Government of Maharashtra, Government of India. Authority and other simillar organisations; monies received from the private or public sector, local and overseas Non-Government Organisations (NGOs), foundations, donor agencies and assistance or grants from foreign Governments or International Organisations and individuals ;

(*c*) Interest and other benefits accured from the Fund ;

(*d*) Any amount of loan received from national or international, commercial and financial institutions for the purpose of energy conservation and related activities ;

(*e*) Surcharge or levies, if any, imposed by the Government for the promotion of the Fund and credited to the Fund ;

(*f*) Donations, subscriptions, contribution, gifts, assistance and loans received from individuals or bodies ;

(*g*) Any other amount authorized for credit to the Fund under the provisions of the Act or the Rules made thereunder ;

(*h*) Service charges, maintenance charges, consultancy fees, any other fees and all other incomes arising and accruing in pursuance of the administration of the Fund ;

(*i*) Any tax or cess imposed on sale or generation of electricity for the purpose of energy conservation ; and which is passed on to the Fund by the Government ;

(*j*) Deposits from any local Government, Public Undertaking, Distribution Licensee for the purpose of Energy Conservation or Energy Efficiency.

**7.** *Purposes for which the Fund shall be applied.*—(*1*) The Fund shall be applied :—

(*a*) to provide financial assistance in the form of grants, normal and soft loans, investment, subsidies, credit guarantees or risk guarantees, for investment in projects of Government departments, State enterprises, public limited companies, consumer's organisations, private organizations, educational institutions or any consumer of electricity distribution company, for the efficient use of energy and its conservation ;

(*b*) to provide financial assistance to and to incur expenditure on projects, schemes, programmes relating to energy conservation ; energy efficiency, energy management and environment ;

(*c*) to meet the expenditure incurred for taking measures to create awareness and disseminate information for efficient use of energy and its conservation, especially for consumers, industrial and commercial sectors, school children, farmers and the public ;

(*d*) to meet the expenditure incurred for training of personnel and specialists for the efficient use of energy and its conservation ;

(*e*) to promote the use of energy efficient processes, forms, equipments, devices and systems ;

(*f*) to provide financial assistance to demonstration projects and pilot projects on energy conservation and energy efficiency, and on energy efficiency of equipments, appliances and process system ;

(*g*) to study or carry out research projects on energy use data collection, analysis and survey, energy development, promotion and conservation ;

(*h*) to meet the expenditure incurred towards the promotion of research and development in the field of energy conservation ;

(*i*) to meet the expenditure incurred to develop testing and certification procedure, creation of testing facilities for certification or verification of energy consumption of equipments and appliances ;

(*j*) to meet the expenditure incurred for formulating and facilitating implementation of pilot projects and demonstration projects for promotion of efficient use of energy and its conservation or to provide matching contribution for such projects taken up by Bureau of Energy Efficiency ;

(*k*) to meet the matching grant to the centrally sponsored schemes and schemes of Bureau of Energy Efficiency implemented in the State ;

(*l*) to meet the expenditure on any project, scheme or programme approved by the authority or the Government relating to the efficient use of energy and its conservation ;

(*m*) to meet expenditure on innovative projects on energy efficiency, energy conservation or demand side management ;

(*n*) to meet the expenditure relating to the organisation and management of the Energy Conservation Cell of the Authority dealing with the administration of the Fund ;

(2) All money received for and on behalf of the Fund as specified in rule 6, shall be placed in current or savings accounts or in term deposits with Nationalized Banks. The said accounts shall be operated in such manner as may be decided by the authority.

**8.** *Operation of the Fund.*—All expenditure shall be approved by the Director General as per the sanctioned budget of the Fund.

**9.** *Norms, guidelines and procedure for assistance from the Fund by Authority.*—The Authority shall develop suitable norms, guidelines and procedures for assistance from the Fund. The funding eligibility norms, proposal preparations, schéme or progrmme guidelines, evaluation guidelines for project appraisal, procurement regulation and application procedures shall be prepared from time to time, for assistance from the Fund.

**10.** *Accounts and Audit.*—(*a*) The Authority shall maintain books of accounts of the Fund and shall prepare an annual statement of accounts and balance sheet in such form and in such manner, as may be approved by the Authority which shall be in conformity with the provision of sub-section (2) of section 32 of the Bombay Public Trusts Acts, 1950 (Bom. XXIX of 1950). The Authority shall submit its income and expenditure statement to the State Government every three months.

(*b*) The accounts of the Fund shall be audited by the Chartered Accountant to be appointed by the Authority. The Accountant General, Maharashtra State may, at his discretion, at any time, cause an audit of the accounts of the Fund. The audit report prepared by the Accountant General, if any, shall be presented to the State Government.

(*c*) The accounts of the Fund as certified by the Chartered Accountant so appointed together with the audit report thereon shall be presented annually to the State Government, the Bureau of Energy Efficiency (BEE) and the State Energy Conservation Committee.

**11.** *Annual report.*—The Authority shall during each financial year prepare an annual report giving a true and full account of the activities undertaken from the Fund in the previous financial year, and a copy of such report shall be furnished to the Government.

**12.** *Closure of Fund.*—(*a*) The Fund shall remain operative so long as the relevant provisions of the Act remains force.

(*b*) At the time of closure of the Fund when the Fund is no longer required all the unspent balance under the same shall be remitted into the Government.

By order and in the name of the Governor of Maharashtra,

AJOY MEHTA,
Principal Secretary to Government.

ON BEHALF OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATION, PRINTED AND PUBLISHED BY SHRI PARSHURAM JAGANNATH GOSAVI, PRINTED AT GOVERNMENT CENTRAL PRESS, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004 AND PUBLISHED AT DIRECTORATE OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATION, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004, EDITOR : SHRI PARSHURAM JAGANNATH GOSAVI.